ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय, अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १५ एप्रिल, १९५३ अंक १५

## विविध माहिती

**उत्तर-प्रदेश अधिक कापूस पिकविणार**—उत्तर-प्रदेश सरकारनें आपल्या राज्यांत अधिक कापूस पिकविण्याचें ठरविलें आहे. ह्या धोरणास अनुसरून राज्यांत ५०,००० एकर जमिनींत नव्यानें कापसाची लागवड करण्यांत येणार आहे.

**रेल्वेचा डबे बांधण्याचा खर्च**—रुंद रुळाच्या रेल्वेवर धांवणारा व हवामान सुखद राखणारा एक डबा बांधण्यासाठी २,७१,००० रुपये खर्च येतो. दुसऱ्या वर्गाचा डबा बांधण्यासाठी १,४७,००० हजार रुपये खर्च येतो आणि तिसऱ्या वर्गाचा डबा बांधण्यासाठी १,१७,००० हजार रुपये खर्च येतो.

**रात्रीची हवाई वाहतूक**—१९५२ सालीं रात्रीची हवाई वाहतूक करणाऱ्या विमानांनीं २७,००० उतारू वाहून नेले, ३० लाख पौंड वजनांचीं पत्रें नेलीं आणि १० लाख पौंड वजनाचें सामानसुमान नेलें.

**म्हैसूरच्या सरकारला कर्ज**—मध्यवर्ती सरकारनें म्हैसूरच्या सरकारला १ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्ज परत मागितल्यापासून एका वर्षानें दहा सारख्या हप्त्यांनीं फेडावयाचें आहे. कर्जावर ४ टक्के व्याज घेण्यांत यावयाचें असून त्याचा विनियोग नद्या सुधारण्याच्या कामीं करण्यांत येणार आहे.

**सीलोनला ट्रॅक्टर्स मिळणार**—पुढील महिन्याच्या अखेरपर्यंत ऑस्ट्रेलिआचें सरकार सीलोन सरकारला १९० ट्रॅक्टर्स पाठविणार आहे. ही मदत कोलंबो योजनेप्रमाणें करण्यांत येणार असून तीसाठी ऑस्ट्रेलिअन सरकारला २९,०१,३४० रुपये खर्च येणार आहे. ट्रॅक्टर्सवर कोलंबो योजनेचा उल्लेख करणारी पाटी लावण्यांत येणार आहे.

**इजिप्तला हिंदी कोळसा पाहिजे**— इजिप्तच्या सरकारनें भारतीय सरकारकडे कोळशाची मागणी केली आहे असें समजतें. भारताचा कोळसा इजिप्तला अधून-मधून जात असे; पण आतां त्याची मागणी मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत आहे. सध्या इजिप्त त्याला लागणारा कोळसा अमेरिकेंतून व इतर देशांतून आयात करतो.

**रशिआ अधिक बोटी बांधणार**— रशिआ आपल्या गोद्यांतून बोटींचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करीत आहे. पण त्याबरोबरच युरोपीय देशांच्या गोद्यांतूनहि रशिआसाठी बोटी बांधण्यांत येत आहेत असें समजतें. सध्या हॉलंड, बेल्जिअम आणि इटली ह्या देशांतून रशिआसाठी बोटी बांधण्यांत येत आहेत.

**भारताला ४०० टन पोलाद**— भारताला अमेरिकेकडून टेक्निकल कोऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे ५०,००० टन पोलाद मिळणार आहे. त्यापैकी ४०० टन पोलादाचे पत्रे नुकतेच एका जपानी बोटीनें मुंबई बंदरांत आणले. ह्या साह्याच्या करारा-प्रमाणें भारतांत आतापर्यंत २,५०० टन पोलाद आलें आहे.

**ओरिसांत माकडांचा संहार**—ओरिसा राज्यांत १९५१-५२ आणि १९५२-५३ ह्या सालीं अनुक्रमें ६६,७५७ आणि ५८,१८१ माकडांचा संहार करण्यांत आला. त्यासाठीं ९,६४,८९० रुपयांची रक्कम खर्च करण्यांत आली.

**रशिआचा मोटारींचा प्रचंड कारखाना**— मॉस्को येथें स्टॅलिन मोटारकार वर्क्स नांवाचा एक प्रचंड कारखाना आहे. ह्या कारखान्यांत ४०,००० कामगार काम करीत असून त्यांपैकी ४० टक्के स्त्रिया आहेत. ह्या कारखान्यांच्या आवारांतच ३८ मैल लांबीची रेल्वे बांधण्यांत आलेली आहे.

**नाशिक जिल्ह्यानें केलेली बचत**— मार्च, १९५३ अखेर संपलेल्या वर्षांत नाशिक जिल्ह्यानें छोट्या बचतयोजनेप्रमाणें १२ लाख रुपये गुंतविले असें समजतें. ह्या जिल्ह्यासाठी १८ लाख रुपयांचें उद्दिष्ट ठरवून देण्यांत आलें होतें.

**नेपाळमध्यें कोळसा**— नेपाळमधील ज्या निर्मनुष्य डोंगराळ भागांची अद्याप पहाणी झालेली नाहीं अशा भागांची पहाणी करण्याचें काम भारतीय सरकारच्या सर्व्हे ऑफिसनें करावयाचें ठरविलें आहे. ही पहाणी जमिनीवरून व आकाशांतूनहि करण्यांत येणार आहे. भारतीय भूगर्भ-शास्त्रज्ञांच्या एका तुकडीला प. नेपाळांत लोखंड, तांबें, चुनखडी व संगमरवरी दगड इत्यादींचे सांठे आढळून आले आहेत.

**सौराष्ट्राच्या बंदरांचा उपयोग**— सौराष्ट्राचे गृहमंत्री श्री. रसिकलाल पारेख ह्यांनीं अशी सूचना केली आहे, कीं गुजरातमधील कारखानदारांनीं सौराष्ट्रांतील बंदरांना अधिक उपयोग करावा. सौराष्ट्रांत भावनगर, वेरावळ, पोरबंदर, बेडी व नवलाखी अशीं पांच प्रमुख बंदरें असून त्यांच्या द्वारां १६ ते १८ लाख टन माल दरसाल आयात होऊं शकेल अशी माहिती त्यांनीं दिली.

**बॉंबपासून संरक्षण**—जळत्या पेट्रोलच्या बॉंबपासून संरक्षण करण्याच्या प्रयोगांत स्वीडनच्या शास्त्रज्ञांना यश मिळालें आहे असें समजतें. अशा प्रकारचे बॉंब कोरिआमधील युद्धांत अमेरिकन लष्करानें मोठ्या प्रमाणावर वापरले.

## शेठ वालचंद हिराचंद ह्यांचा मृत्यु

शेठ वालचंद हिराचंद हे आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षी, गेल्या बुधवारीं, मृत्यु पावले. अगदीं प्रतिकूल राजकीय व आर्थिक परिस्थितींत हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं त्यांनीं विलक्षण चिकाटीनें प्रयत्न केले. बंगलोर येथील हिंदुस्थान एअर-क्राफ्ट कंपनी, विशाखापट्टम् येथील आगबोटी बांधण्याची योजना, सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी, इत्यादि उपक्रमांचें राष्ट्रीय महत्त्व स्वयंसिद्ध आहे. इतर कितीतरी कंपन्या त्यांनीं काढल्या व वाढविल्या. फाटक अँड वालचंद लि., प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि. हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कं. लि., इंडियन ह्यूम पाइप कं. लि., मार्सलंड प्राइस अँड कं. लि., रावळगांव शुगर फार्म लि., कूपर इंजिनिअरिंग लि., ॲक्मी मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., इत्यादि उपक्रमांचें श्रेय शेठ वालचंद ह्यांसच आहे. एकाकाळीं त्यांच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली ४६ कंपन्या होत्या. शेठ वालचंदांचें घराणें गुजरातमधलें; सुमारें १०० वर्षांपूर्वी त्यांचे आजोबा सोलापूर जिल्ह्यांत स्थाईक झाले. त्यांच्या ( दिगंबर जैन ) समाजांतील पुरुष मराठीच बोलतात, त्यांचे हिशेब मोडींतच लिहितात. एका नव्या संस्थेच्या स्थापनेचे वेळीं "महाराष्ट्रिया"ची व्याख्या ठरवितांना, "जो आपले हिशेब मोडींत ठेवतो, तोच पक्का महाराष्ट्रीय" अशी व्याख्या सुचविण्यांत आली. मोडींत हिशेब ठेवणारे व पत्रव्यवहारहि करणारे शेठ वालचंद हिराचंद त्या सभेंत एकटेच आढळले ! शेठ वालचंद ह्यांच्या चतुरपणाबद्दल एकच गोष्ट येथें नमूद करतों. एका नव्या कंत्राटाच्या ठिकाणीं पहिल्या प्रथमच ते गेले, तेव्हां एका टांग्यांत बसून ते निघाले. टांगेवाल्याशीं बोलतां बोलतां त्यांनीं टांगेवाल्याकडून टांगा, घोडा, वगैरे सर्व विकत घेऊन टांग्यांतून उतरण्यापूर्वीच टांग्याच्या मालकास स्वतःचा नोकर बनविलें ! "मला उभें रहाण्यापुरती जागा मिळूं दे, मी सबंद पृथ्वी हलवून सोडीन" ह्या आर्किमिडीजच्या उक्तीप्रमाणें शेठ वालचंद ह्यांची कृति होती. शेठ वालचंद ह्यांच्या मृत्यूमुळें एका कर्तबगार उद्योगपतीस भारत मुकला आहे.

---

## विमा विक्रीच्या सुरस सत्यकथा

( ले. श्री. शि. न. कोल्हटकर, बी. ए., किंमत २ रुपये अंजलि प्रकाशन लि., )

प्रचलित समाजरचना चालू आहे तोंपर्यंत सर्व अपेक्षित आणि अनपेक्षित प्रसंगांची तरतूद व्यक्तीलाच आपल्या जबाबदारीनें करावी लागते. आयुर्विमा ही संस्था अशा प्रसंगाची सोय करणारी एक उपयुक्त संस्था आहे. परंतु सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकाला ह्या विषयाची फारशी माहिती नसते. त्यामुळें परिणाम असा होतो कीं, विमा-प्रचारकाला ग्राहकांच्या अज्ञानामुळें कां होईना पण एक प्रकारच्या अदृश्य वैरभावाला किंवा निदान उदासिनतेला तोंड द्यावें लागतें. पण विमा-प्रचारक आपल्या कामांत तरबेज असला आणि विमा-प्रचार ही समाजसेवा करण्याची एक संधि आहे अशी त्याची धारणा असली तर तो आपल्या कामांत यशस्वी झाल्याखेरीज रहात नाहीं. श्री. कोल्हटकर ह्यांनीं आपल्या पुस्तकांत निरनिराळ्या स्वभावाच्या विमाग्राहकांशीं कसें वागावें ह्यासंबंधीं अनुभवपूर्ण दिग्दर्शन केलें आहे, तें चिंतनीय वाटतें. विमाग्राहकाच्या गरजा पुष्कळदा त्याच्या त्यालासुद्धां ठाऊक नसतात. त्या त्याला पटवून देऊन त्याच्या आर्थिक कुवतीला झेपेल असाच विमा त्याला देणें श्रेयस्कर असतें. ग्रंथकारानें ह्याहि बाजूचा चांगला अभ्यास केलेला दिसून येतो. पुस्तकाची भाषा सोपी असून कथनशैलीला एक प्रकारचा स्वाभाविक ओघ आहे. त्यामुळें विम्याच्या प्रचाराचें हें गोष्टीरूप पुस्तक विमा प्रचारकांना चांगलेंच उपयुक्त वाटेल.

—ग. रा. जोग

## उद्बोधक उद्गार

### पंचवार्षिक योजना ठीक, पण गति कमी करा

"सध्याच्या परिस्थितींत, पंचवार्षिक योजना पार पाडण्याचें आर्थिक सामर्थ्य भारताजवळ आहे किंवा नाहीं, ह्याची शंका वाटते. मूलतः योजना व्यवहार्य असली, तरी तिची गति थोडी मंद करावी लागेल, आणि ही गोष्ट लवकरच कबूल करणें शहाणपणाचें ठरेल. कृत्रिम उपायांनीं गति चालू ठेवण्यानें करांचा असह्य बोजा कायम राखावा लागेल, औद्योगिक प्रगतीस आळा बसेल आणि रहाणीच्या खर्चाचें सर्वसाधारण मान वाढेल. सरकारी व खासगी विभागांत योग्य तें प्रमाण राखलें पाहिजे. खर्चाची फिकीर न करतां सरकारी योजनेचा भाग पुढें दडपला, तर खाजगी प्रयत्नांकडून अपेक्षित फलप्राप्ति होणार नाहीं. हिंदी आर्थिक परिस्थिति दृढ पायावर आधारलेली आहे, पंचवार्षिक योजना सर्वांगिण दृष्टीनें विचार करून आखलेली आहे, हें सर्व खरें; पण सध्याच्या जागतिक अनिश्चित परिस्थितींत जरा सबुराईचें धोरण पत्करणें भारताच्या अंतिम हिताचें होईल":— हिंदी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे माजी सभासद व हिंदी चहा असोसिएशचे लंडन येथील सल्लागार, सर पर्सिव्हल ग्रिफिथ्स.

---

### पुणें जिल्हा ख. वि. संघाच्या गोडाऊनचें उद्घाटन

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. पुणें ह्यांनीं भवानी पेठ, पुणें येथें बांधलेल्या नवीन गोडाऊनचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि. १८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें होणार आहे. गोडाऊनसाठी सुमारें ५० हजार रु. खर्च आला आहे.


दि

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : मुख्य कचेरी–लक्ष्मी रोड, पुणें २

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | .... रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | .... रु. | ६,१६,००० |
| एकूण खेळतें भांडवल.... | रु. | २,४०,००,००० |

बँकेच्या शाखा

मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण ), पुणें ( डेक्कन जिमखाना व खडकी ), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर ( म्हैसूर सं. )

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १५ एप्रिल, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायदा दुरुस्तीची आर्थिक प्रगतीस मदत

ग्रेट ब्रिटनमधील बोर्ड ऑफ ट्रेडचे एक माजी अंडर सेक्रेटरी, मि. ई. एच. मार्कर, हे भारत सरकारच्या निमंत्रणावर येथें आले आहेत. भाभा कमिटी ( इंडियन कंपनी लॉ कमिटी )च्या अहवालास ग्रेट ब्रिटनमधील कंपनी कायद्याचा आधार घेतलेला आहे आणि त्या कंपनी कायद्याची अंमलबजावणी कशी होते ह्याबाबत भारत सरकारला माहिती पुरविणें, हा मि. मार्कर ह्यांच्या येथील वास्तव्याचा उद्देश आहे. त्यांनीं मुंबई येथील आपल्या एका भाषणांत कंपनी कायदा सुधारणेसंबंधीं मननीय विचार व्यक्त केले.

व्यापारं व उद्योगधंदे करण्यास आतां व्यक्ती किंवा भागीदाऱ्या अपुऱ्या पडतात; पैसे गुंतवूं शकणाऱ्यांचें धन एकत्रित करून तें उपयोगांत आणण्यासाठी मोठ्या संस्था आवश्यक होतात. खासगी कंपनीची शक्ति अपुरी होऊन मोठ्या पब्लिक कंपन्या आल्या आणि त्यांचीहि शक्ति अपुरी पडून मोठ्या होल्डिंग व सबसिडिअरी कंपन्या अस्तित्वांत आल्या. त्यांचें नियंत्रण करणारा कायदा खोडसाळपणास प्रतिबंधक परंतु विश्वासूपणास वाव देणारा असणें इष्ट. आगामी घडामोडींचा अगाऊ विचार करून त्यावर उपाययोजना कायद्यांत केलेली असली पाहिजे. विश्वासार्ह लोकांचे हातांत कंपन्यांचीं सूत्रें असतील, तर सर्व जनतेस चांगलीं फळें चाखावयास मिळतील. परंतु काटेकोरपणें न वागणारांच्या हातीं असलेल्या कंपन्या अनर्थ कोसळवतील. सरकारला कंपनी कायद्यानें जे अधिकार दिलेले होते, ते न वापरल्यामुळें आजपावेतों कंपन्या बरेच घोटाळ्याचे व्यवहार करूं शकल्या, अशी टीका ऐकूं येते. परंतु सरकारजवळ आवश्यक तेवढे अधिकारच नव्हते, असा अनुभव आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें मुख्यतः होल्डिंग व सबसिडिअरी कंपन्यांमार्फत व्यापार चालतो, तर भारतांत मॅनेजिंग एजन्सीचें प्राबल्य आहे. ह्या पद्धतीनें भारतांतील व्यापार-उद्योगाच्या वाढीस बराच हातभार लावलेला आहे आणि या पद्धतीमधील चांगल्या गोष्टी कायम कशा राहतील, ह्याकडे भाभा कमिटीनें लक्ष पुरविलें, हें योग्यच आहे. सध्यांच्या सामाजिक न्यायाप्रमाणें, ज्या संस्था किंवा व्यक्ती सरासरी दर्जापेक्षा वरती असतील, त्यांनाहि सरासरी दर्जाखालील संस्था व व्यक्ती ह्यांचेप्रमाणेंच कायद्याच्या कडक तरतुदींचा अंमल सोसावा लागतो. सुव्यवस्थित व्यापार-उद्योगास अडचण वाटणार नाहीं, अशी शक्य ती दक्षता भाभा कमिटीनें घेतली आहे. अयोग्य कार्यपद्धति नष्ट करतांना कायद्यांत पुरेसा लवचीकपणा राखण्याचा प्रयत्नहि भाभा कमिटीनें केला आहे. लवचीकपणाचा दुरुपयोग होण्याची शक्यता केव्हांहि रहाणारच हें खरें असलें, तरी तो धोका पत्करणें कमिटीस योग्य वाटलें आहे. अर्थात्, भामटेगिरीस वाव राहूं नये, ह्याची खबरदारीहि कमिटीनें घेतली आहे. कंपनी कायद्यांत पळवाटा काढून लोकांनीं अनिष्ट प्रकार आजवर केले आहेत, हें निर्विवाद आहे. तेव्हां, कंपनीकायद्याचीं बंधनें अधिक बळकट करणें सरकारास अपरिहार्यच आहे. भाभा कमिटीच्या शिफारसींवर आधारलेला कंपनी कायदा, मॅनेजिंग एजन्सी पद्धतीस ज्या अनिष्ट प्रकारांमुळें दूषण प्राप्त झालें आहे त्या अनिष्ट प्रकारांस आळा घालील आणि त्याबरोबरच पैसे गुंतविणारांचा विश्वास वाढेल अशा योजनांस उत्तेजन देईल, अशी आशा आहे. कायदा कितीहि चांगला झाला तरी व्यापारी वर्गाच्या हार्दिक सहकार्याविना त्याचा पुरेपूर फायदा पदरांत पडणार नाहीं. म्हणून, व्यापाऱ्यांनीं त्यांच्यावरील जबाबदारी ओळखली पाहिजे. भारताच्या योग्य प्रकारच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीस कंपनी कायद्याच्या सुधारणेमुळें चांगली मदत होणार आहे. कंपनी कायद्यांत दुरुस्ती व सुधारणा करणारें बिल शक्य तों निर्दोष करण्याचा सरकारचा प्रयत्न असून हें बिल पार्लमेंटाच्या चालू अधिवेशनांत मांडलें जाणार नाहीं असें समजतें.

## कामगारांची मजुरी वाढली, तरी स्थिति बिघडली

भारतांतील औद्योगिक कामगारांच्या मजुरीचे १९४४ ते १९४९ चे इंडेक्स नंबर्स प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून ह्या काळांत मजुरींत झालेल्या वाढीची कल्पना येते. १९३९ = १०० ह्या हिशेबानें १९४६ मध्यें इंडेक्स नंबर २११ झाला, १९४७ मध्यें २५७ झाला, १९४८ मध्यें ३०९ झाला आणि १९४९ मध्यें तो ३४६ वर गेला. युद्धोत्तर काळांत कामगारांनीं मजुरींत वाढ मिळण्यासाठी केलेले कलह, कामगारांच्या मागण्यांबद्दल मध्यवर्ती व राज्यसरकारांची सहानुभूति आणि ॲडज्युडिकेटर्स, इंडस्ट्रिअल ट्रायब्युनल्स व कोर्टें ह्यांनीं मजुरींत करविलेली वाढ, ह्या सर्वांचा तो परिणाम होता. रहाणीच्या खर्चाच्या मानानें इंडेक्स नंबर्स पाहिले, तर १९४६–१९४९ ह्या मुदतींत औद्योगिक कामगारांच्या "खऱ्या" उत्पन्नांत २२% वाढ झालेली आढळते. १९३९–४४ ह्या मुदतींत ज्या प्रमाणांत महागाई वाढली त्या प्रमाणांत मजुरी वाढली नाहीं ह्याचा अर्थ कामगारांच्या "खऱ्या" उत्पन्नांत घटच झाली, ती १९४६–४९ मधील खऱ्या उत्पन्नांतील २२% वाढीनें भरून निघाली नाहीं. म्हणजे, १९३९ चे मानानें १९४९ मध्यें औद्योगिक कामगारांची स्थिति, ज्यास्त मजुरी मिळूनहि, अधिकच वाईट होती.

## रिझर्व्ह बँकेच्या नोकरांसाठी इस्पितळांत सोय

रिझर्व्ह बँकेनें १९४८ सालीं मुंबई कॉर्पोरेशनला २,५०,००० रु. देणगी दिली होती. तिचा विनियोग कॉर्पोरेशननें के. ई. एम्. इस्पितळांत सुमारें ४० खाटांचा एक वॉर्ड बांधून त्यांत सर्व सोई करण्याकडे करावयाचा होता. सर्व खाटांत मिळून २० खाटा रिझर्व्ह बँकेच्या नोकरवर्गासाठी राखून ठेवल्या पाहिजेत, अशी बँकेची अट होती. वॉर्ड आतां बांधून झाला आहे, पण तो सुसज्ज करण्यासाठी पुरेशी रक्कम उरली नाहीं. म्हणून कॉर्पोरेशननें आणखी देणगी रिझर्व्ह बँकेकडे मागितली. त्याप्रमाणें, बँकेनें ३५,००० रुपयांची नवी ग्रँट दिली आहे. के. ई. एम्. इस्पितळांत २० ऐवजीं १५ खाटा राखून ठेवाव्यात आणि ५ खाटा नायर इस्पितळांत राखून ठेवाव्यात अशी अट आतां रिझर्व्ह बँकेनें घातली आहे. कारण, रिझर्व्ह बँकेच्या भायखळा येथील नव्या वसाहतींतील नोकरवर्गास नायर इस्पितळ जास्त जवळ पडेल.

## वारसा कर

( श्री. कृ. ह. कब्बूर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष )

भारताच्या लोकसभेमध्यें एस्टेट ड्यूटी बिल ऑगस्ट १९५२ मध्यें मांडण्यांत आलें. आगामी अंदाजपत्रकी अधिवेशनांत हें बिल येऊन यावेळीं पासहि होण्याची शक्यता आहे.

हें बिल सादर झाल्याबरोबर त्या बिलामागील तत्त्वाला सर्व-साधारण सर्वत्र पाठिंबा आढळला. मात्र त्यासंबंधीं, त्याच्या अंमलबजावणीसंबंधीं व सविस्तर अंगोपांगासंबंधीं, विविध सूचना करण्यांत आल्या. या तऱ्हेची करपद्धति जरी आपल्या देशाला परिचित नसली तरी निरनिराळ्या देशांच्या करपद्धतीला ती नवी नाहीं. इंग्लंडमध्यें ६० वर्षांहून अधिक काळपर्यंत ती अस्तित्वांत असून अमेरिका, ब्राझिल, अर्जेंटाईन, चिली, कॅनडा, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फ्रान्स, जर्मनी, स्वीडन, नॉर्वे, हॉलंड, स्वित्झर्लंड, इटली, स्पेन, पोर्तुगाल, सयाम, चीन, जपान आदि देशांतून वारसा कर कायदा अस्तित्वांत आहे.

संपत्तीची विषम वाटणी सम करण्याचें एक साधन म्हणून हा कायदा असल्याचें सर्वत्र समजलें जात असून त्या दृष्टीनें त्याचा पुरस्कार होत आहे. यामुळें संपत्तीचें केंद्रीकरण थोड्यांच्या हातांत होण्याचें टळेल व टाळावें हा उद्देश आहे. अर्थात कायद्याच्या हेतू आणि उद्देश्यांत जरी या गोष्टीचा उल्लेख असला तरी हें ध्येयवादित्व व त्याकरितां होत असलेली उपाययोजना हे जरी सोडून दिले, तरी त्याचा मूळ उद्देश सरकारच्या उत्पन्नांत भर पडावी हा आहे हें एक निर्विवाद सत्य आहे. इतर देशांतील सरकारेंहि उत्पन्नाची मोठी बाब म्हणूनच याकडे बघतात, व त्यादृष्टीनें आपलें सरकारहि ह्याला अपवाद नाहीं. जास्तींत जास्त उत्पन्न वाढावें अशी सरकारची इच्छा आहे व आजची सरकारची वाढती गरज लक्षांत घेतां त्यांना असल्या उपाययोजनेशिवाय गत्यंतर नाहीं हें स्पष्ट आहे.

सरकार जेव्हां नवीन कर लादतें अगर नवीन मार्गांनें उत्पन्न वाढविण्याच्या योजना आखते तेव्हां देशांतील अर्थव्यवस्था व ती ज्यांचे हातांत आहे त्यांची कार्यपद्धति यांचें परीक्षण होणें सहाजिक आहे. सरकारी पैशाची उधळपट्टी, बेसुमार खर्च, अति खर्चाच्या योजना हातीं घेणें, व विविध प्रश्नांकडे वास्तववादानें न बघतां ध्येयवादित्वानें पाहून ते भावनाविवशतेनें हाताळणें यामुळें सरकारी खजिना रिकामा होत आहे. त्यामुळें सरकार आर्थिक अरिष्टांत कांहीं वेळां सांपडलें व कोलमडेल किंवा काय अशी भीति वाटली त्यामुळें सहाजिकच अर्थमंत्र्यांचें लक्ष नवीन नवीन उत्पन्नाच्या बाबी हुडकण्याकडे लागणें सहाजिक आहे. आज कराच्या ओझ्याखालीं धंदे व इतर व्यवसाय इतके भारावले आहेत, कीं यापेक्षा अधिक कर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें लादणें त्यांना पेलण्यासारखें नाहीं. व्यापारी मंदीची झळ आतांच सरकारी उत्पन्नाला भासू लागली आहे. प्राप्तीकर व जकात यांच्या उत्पन्नांत घट आली; असून यापुढें जादा कर आकारणें म्हणजे सोनेरी अंडीं देणाऱ्या कोंबडीला मारण्यासारखें आहे. उत्पन्न वाढवावयाचेंच असेल तर यांतून मार्ग म्हणजे वैयक्तिक संपत्तीवर कर लादणें हाच आहे.

या कायद्याच्या प्रत्येक कलमाची तपासणी करणें येथें इष्ट नाहीं. पण कायद्यांत ज्या उणीवा आहेत किंवा तदनुसार ज्या अडचणी येतील त्यांचा उल्लेख मी करतों. शेतकीच्या संपत्तीचा समावेश कर आकारणींत प्रथमतःच करण्यांत आला आहे. भारताच्या घटनेच्या २५२ कलमानुसार मध्यसरकारला घटकराज्य सरकारांच्या संमतीशिवाय, शेतकीच्या संपत्तींवर कर लादतां येत नाहीं. मुंबई, उत्तरप्रदेश, ओरिसा, मध्यप्रदेश, हैद्राबाद व राजस्थान सरकारांनीं भारतसरकारला संमति दिली आहे. इतर राज्यसकारांनीं अजून संमति दिली नाहीं. तरी या सरकारांची संमति मिळविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. नाहींतर या कायद्यानुसार होणाऱ्या कर-आकारणींत पंक्तिप्रपंच झाल्यासारखें होऊन कराची आकारणी सर्व देशभर भिन्नभिन्न होईल. दुसरें कायद्यांतील वैगुण्य म्हणजे संमतीची किंमत ठरविण्यासंबंधी जी उपाययोजना आहे त्यानुसार "मरण पावलेल्या व्यक्तीच्या संपत्तीची त्यावेळीं खुल्या बाजारांत किंमत येईल ती करावी" व अशारीतीनें कर आकारणी करतांना संपत्तीचें मूल्यमापन करावें असें सुचविलें आहे. आपल्या देशांत 'स्टॉक आणि प्रापर्टी मार्केट' ची अद्यावत वाढ न झाल्यामुळें या मार्गानें किंमत ठरविणें गैर होईल असें मला वाटतें. यामुळें अगोदरच लाचलुचपतीनें कलंकित होऊन बसलेल्या राजवटींत लाचलुचपतीला अधिक वाव दिल्यासारखा होईल. नियंत्रणें सुरू झाल्यापासून सरकारकडून त्यांच्या अंमलबजावणींत अशा पळवाटा ठेवल्या गेल्या आहेत कीं त्यामुळें लांचलुचपतीला वाव मिळाला. या कायद्यानुसार कंट्रोलरला जी सत्ता देण्यांत आली आहे तीमुळें लोकांच्या पाठिमागें नसतो जाच सुरू होईल अशी भीति वाटते. या कायद्यानुसार व्यक्तीला किती कर द्यावा लागेल याची कल्पना दिली नाहीं ही गोष्ट दरवर्षाच्या आर्थिक कायद्यावर सोंपविण्यांत आली आहे. यामुळें सुरवातीच्या काळांत आर्थिक गरजेनुसार कर लादण्यांत येतील. तसेंच ज्यांना सूट देण्यांत यावयाची आहे, त्यांचे संबंधांत व कराचे प्रमाणाबाबत कायदा मुग्ध आहे. यासंबंधीं मला अशी सूचना करावीशी वाटते कीं प्रथमावस्थेंत सुटीचें प्रमाण सवलतीचे असावे व कराचे आकाराचें प्रमाण फार मोठें नसावें. नाहींतर व्यक्ती कार्यप्रवणता नष्ट होईल अशी भीति वाटते.

( चेंबरच्या त्रैमासिक सभेंतील भाषण, १४-३-१९५३ )

---

**भारतामध्यें कराचा भार—** भारतामधील अधिक उत्पन्नाच्या गटावर बसविण्यांत येणारा कर इतर बहुतेक देशांतील करापेक्षा अधिक म्हणजे ८२ टक्के आहे. अमेरिका व इंग्लंड येथें मात्र ही टक्केवारी भारतापेक्षा अधिक आहे. अमेरिकेंत ९१ टक्के आणि ब्रिटनमध्यें ९७·५ टक्के कर आकारला जातो.

**रशिआंत अधिक इंजिनिअर्स तयार होणार—** अमेरिकेमधील नॅशनल सायन्स फौंडेशनचे चालक डॉ. अलैन वॉटरमन् ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, तरूण शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स शिकवून तयार करण्याच्या कामांत रशिआ अमेरिपेक्षा झपाट्यानें प्रगति करीत आहे. १९५५ सालीं रशिआंतील विद्यापीठांतून ५० हजार एंजिनिअर्स बाहेर पडतील, तर अमेरिकेंत अवघे १७ हजारच तयार होतील, असें ते म्हणाले.

**१०० वर्षांची जुनी बंदूक—** अहमदाबाद येथें बंदुकीच्या नेमबाजीची एक स्पर्धा नुकतीच भरविण्यांत आली होती. ह्या चढाओढीस कठोसनच्या ठाकोरांनीं १०० वर्षांपूर्वीची दारू ठासून भरून उडविण्याची बंदूक वापरली. ही बंदूक ठाकूर साहेबांच्या पूर्वजांना ईस्ट इंडिआ कंपनीनें भेट म्हणून दिली होती.

**मद्रास-सरकारला मदत—** मद्रास सेंट्रल इंडस्ट्रिअल म्युझिअमची इमारत बांधण्यासाठीं भारतीय सरकारनें मद्रास सरकारला ५०,००० रुपये देणगीदाखल दिले आहेत असें समजतें.

## इनूकमटॅक्सचा बोजा कमी करण्याची मागणी

### प्रेसिडेन्सी इं. बँकेचे अध्यक्ष, श्री. ग. रा. साठे, ह्यांचें भाषण

"अधिकृत बँकरेट अजून ३½% च असला, तरी तो वाढण्याच्या संभवाच्या छायेंतच, मनी मार्केट आहे. इन्फ्लेशनला आळा घालण्याच्या हेतूनें ही उपाययोजना केली, परंतु त्याचा परिणाम मंदी निर्माण होण्याकडे झाला. बहुतेक सर्व उद्योग-धंद्याची थोडीफार पीछेहाट झाली, उत्पादन घटलें, बेकारी वाढली, लोकांची क्रयशक्ति पुष्कळच कमी झाली. करांत झालेल्या वाढीमुळें ह्या अडचणींत भरच पडली. थोडक्यांत म्हणजे, बहुतेक प्रत्येकासच मागील वर्ष वाईट गेलें. तेव्हां, बँकांवराहि त्याचा थोडाबहुत परिणाम होणें अपरिहार्य होतें. बहुतेक बँकांच्या ठेवींत घट झाली.

"गेल्या वर्षीच्या माझ्या भाषणांत, प्रगतीच्या व विस्ताराच्या योजना हातीं घेणाऱ्या भारतासारख्या देशास चलनसंकोचाचें धोरण कसें घातुक होईल, हें दर्शविलें होतें. सरकारला त्या धोरणापासून होणारे तोटे पटले असावेत असें दिसतें, आणि लंबक दुसऱ्या टोकाचे बाजूस जाऊं लागला आहे. पंचवार्षिक योजना पुरी करण्याच्या नादांत, हा लंबक दुसऱ्या टोकाचें अगदीं शेवट गाठणार नाहीं अशी आशा आहे. सुवर्णमध्य साधणें हें केव्हांहि शहाणपणाचें असतें.

"भारतांत करानें आतां उच्चांक गाठला आहे, ह्याची जाणीव मध्यवर्ती व राज्य सरकारला झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. प्राप्तिकराच्या दरांत भारताचा जगांतील देशांत तिसरा अनुक्रम लागतो, असें आपल्या अर्थमंत्र्यांनींच सांगितलें आहे. करपात्र उत्पन्नावरील दरापुरता हा विचार झाला. परंतु, वैयक्तिक खर्चाच्या ज्या बाबी करपात्र उत्पन्नाचा आंकडा काढतांना अमेरिका व ग्रेटब्रिटन ह्या देशांत वजा करण्यांत येतात, त्या लक्षांत घेतल्या तर भारतांतील दर त्या देशांतील दराइतका खासच भारी पडेल. हें सरकारच्या लक्षांत आलें असलें, तरी त्यानें त्या बाबतींत मोठी सूट देण्याचें मनांत आणलेलें दिसत नाहीं. करपात्र उत्पन्नाची खालची मर्यादा वरती नेण्यांत आली असली तरी धान्याच्या किंमतींत वाढ, विक्रीकर, इत्यादींमुळें त्याचा फायदा नाहींसा झाल्यासारखाच आहे. पुढील वर्षी कराचा दर बराच उतरविला जाईल अशी आपण आशा करूं या.

"गेल्या वर्षीच्या अडचणीच्या काळांतहि बँक १९५१ नफ्याइतका नफा मिळवूं शकली आहे. त्याचें श्रेय बहुतांशीं मॅ. डायरेक्टर श्री. सी. टी. चितळे, मुंबई शाखेचे डायरेक्टर-इन्-चार्ज श्री. एल. एम. जोशी व बँकेचे मॅनेजर श्री. जी. डी. जोगळेकर ह्यांस आहे."

बँकेला १९५२ मध्यें ७२,८०९ रु. नफा झाला त्यापैकीं १९ हजार रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले, २० हजार रु. ची इनूकमटॅक्स व सुपर टॅक्ससाठी तरतूद केली, १९ हजार रु. रिझर्व्ह फॉर इनूव्हेस्टमेंटस्‌कडे वर्ग केले व १५ हजार रु. रिझर्व्ह फॉर बॅड अँड डाउटफुल डेट्सखातीं वर्ग केले.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ७,२४,९१० | कॅश, इतर बँकांत | १०,२७,२६० |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,७३,५१५ | इनूव्हेस्टमेंट | २५,००,१४४ |
| ठेवी | ६१,७९,११७ | कर्जें | ३६,३०,४४३ |

### दि सांगली बँक लि. सांगली

वरील बँकेस १९५२ मध्यें नोकरवर्गास बोनस म्हणून १३,००० रु. पगारांत खर्ची घालून १,१२,०६४ रु. नफा झाला. रिझर्व्ह व इतर फंड ह्यासाठी ५१ हजारांची तरतूद करून व १० हजार रु. करासाठी बाजूस काढून भागीदारांना १२% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ५४,००० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. ८ जानेवारी १९५३ रोजीं बँकेची इचलकरंजी येथें शाखा उघडण्यांत आली.

ह्या वर्षी सुरवातीस बँकेचें शेअर भांडवल ३ लाखांवरून ४॥ लाख झालें आहे. मागील वर्षी रिझर्व्ह व इतर फंड ४,३९,००० रु. चे होते, ते नफा-वाटणीनंतर ४,९०,००० रु. वर गेले आहेत. १९५२ सालांत ठेवींत ६ लक्ष रुपयांची भर पडली आहे. इतर बँकांकडून सांगली बँकेनें अहवालाचे वर्षी कर्ज घेतलें नाहीं. कर्जाची रक्कम मागील सालापेक्षा ४-५ लाखांनीं कमी आहे. [ चेअरमनः आर. व्ही. देशमुख, बी. ए., बी. लिट्. ( ऑक्स ), कलेक्टर, द. सातारा. मॅनेजरः एम्. के. गुते, एम् ए., ए. आय. आय. बी. ]

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४,५०,००० | कॅश व बँकांत | २१,८९,५०९ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ४,३९,२८२ | इनूव्हेस्टमेंट्स | ९८,८०,११२ |
| ठेवी | ८५,९३,५७८ | कर्जें | ४४,८०,६४९ |
| एकूण | १,०३,३४,२६८ | एकूण | १,०३,३४,२६८ |

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेस १९५२ मध्यें ४०,५४० रु. नफा झाला. ८,५०० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ५% करमाफ डिव्हिडंडसाठी ३२,५०० रु. चा विनियोग करण्यांत आला. ( चेअरमन : शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी. मॅनेजर : सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरी : रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ९,४९,९२५ | कॅश व बँकांत | १४,८४,२०१ |
| रिझर्व्ह, इतर फंडस | १,७९,००० | इनव्हेसमेंटस | ३८,६४,००४ |
| ठेवी | ६७,३७,२२२ | कर्जें | २२,८२,८२३ |
| एकूण | ७८,२८,५१३ | एकूण | ७८,२८,५१३ |

### दि बँक ऑफ कराड, लि.

वरील बँकेस १९५२ मध्यें २४,०८४ रु. नफा झाला. त्यापैकीं ७,००० रु. रिझर्व्ह व इतर फंडांत टाकून आणि ८,५०० रु. ची इनूकमटॅक्सची तरतूद करून ४% करमाफ डिव्हिडंडसाठी ८,७१० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेच्या सातारा शाखेचें काम हळुहळु वाढत आहे. ( चेअरमन : एल्. एम्. देशपांडे. मॅनेजर : एम्. व्ही. खंडकर )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,१८,३०० | कॅश व बँकांत | ३,१९,२३१ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ३९,००० | इनूव्हेस्टमेंट्स | ७,९८,६८५ |
| ठेवी | १८,०४,५७४ | कर्जें | ९,८७,१८० |
| एकूण | २१,३०,५९५ | एकूण | २१,३०,५९५ |

# आनंद येथील मुंबई राज्य सहकारी परिषद

( आमचे प्रतिनिधीकडून )

मुंबई राज्य सहकारी परिषदेचें २१ वें अधिवेशन आनंद येथें दिनांक ३ ते ५ एप्रिलपर्यंत झालें. सहकारी परिषद एक वर्षआड भरते व ती प्रायः मुंबई अगर पुणें येथें भरविली जात असे. सहकारी परिषदा मुंबई-पुण्याबाहेर भरवाव्यात व त्यासुद्धा ग्रामीण भागांत भरवाव्यात असें वाटल्यावरून २० वें अधिवेशन धारवाड येथें झालें व आतां २१ वें अधिवेशन गुजरातमध्यें आनंद येथें झालें.

सहकारी परिषद ही मुंबई सहकारी इन्स्टिटयूटच्या संस्था-सभासद व व्यक्ती-सभासद यांचीच असते. यामुळें ज्या सहकारी संस्था इन्स्टिटयूटच्या सभासद नसतात त्यांचे प्रतिनिधी हजर राहूं शकत नाहींत. त्यामुळें परिषदेच्या प्रातिनिधिक स्वरूपांत गौणत्व येतें. परिषदेस सहकारी खात्याचे अंमलदार मात्र बहुसंख्य प्रमाणांत हजर असतात.

आनंद येथील परिषद वल्लभनगर येथें झाली. वल्लभनगर हें एक विद्याकेंद्र असून तेथें शेतकी, स्थापत्य, वाणिज्य, आर्ट्स कॉलेजें असून त्यांत विद्यार्थीहि मोठ्या संख्येनें आहेत. फार मोठ्या अवधींत या ठिकाणीं विद्यालयें स्थापून त्यांची जोपासना करण्यांत आली आहे हें जरी खरें असलें तरी परिषदेचे दृष्टीनें तेथें बरीच अव्यवस्था झाली. आनंद स्टेशनपासून परिषदेचे ठिकाणापर्यंत वाहनाची जरा गैरसोयच होती.

परिषदेस सर्व भागांतील प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष मध्यवर्ती सरकारचे नियोजनमंत्री श्री. नंदा हे होते व तिचें उद्घाटन मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. मुरारजीभाई देसाई यांनीं केलें. परिषदेस मुख्य दिवशीं गुजरात भागांतील बरेच खेडूत उपस्थित होते. प्रथम गुजरात सहकारी बोर्डाचे अध्यक्ष श्री. व्यास यांनीं स्वागतपर भाषण केलें व त्यानंतर इन्स्टिटयूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन यांनीं भाषण करून सहकारी चळवळींचा थोडक्यांत आढावा घेतला.

परिषदचें उद्घाटन करतांना श्री. मुरारजी देसाई यांनीं खेडेगांवांत परिषद झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून, समाज व व्यक्ति यांचा विकास करावयाचा झाल्यास त्यांचेमध्यें प्रथम सहकारी प्रवृत्तीचा विकास व्हावयास पाहिजे असें सांगितलें. पुढें त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, सहकारी चळवळीमध्यें निर्भय कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत व त्यांनीं स्वतंत्रपणें विचार करून समाजासहि त्याप्रमाणें करावयास लावला पाहिजे. सहकारी चळवळीचा विस्तार मोठा झाला असल्यानें जबाबदारीहि वाढली आहे व त्या दृष्टीनें चळवळ मजबूत करणें जरूर आहे असें सांगून सहकारी चळवळीमध्यें पक्षभेद असल्याबद्दल त्यांनीं दुःख व्यक्त केलें.

श्री. नंदा यांनीं आपले भाषणांत पंचवार्षिक योजनेमध्यें सहकारी चळवळीस करतां येणेंसारखें फार मोठें काम असल्याचें सांगितलें. शेतीउत्पादनासाठी लागणारा पैसा, कच्च्या शेतीमालाचें रूपांतर पक्क्या मालांत करण्यासाठी लागणारी मदत, ग्रामोद्योग व खरेदी-विक्रीची व्यवस्था या सर्वांसाठी नियोजनामध्यें तरतूद असून सरकारची इच्छा हें काम सहकारी संस्थांमार्फत शक्य तेवढें व्हावें असें आहे. नियोजनाचा कार्यक्रम हा राष्ट्राचा असा असल्यानें त्याबाबत सर्वांनीं साहाय्य करणें अगत्याचें आहे व होणारा खर्च हा योग्य दृष्टीनें होत आहे याची दखलगिरी सर्वांनीं घेणें जरूर आहे असें त्यांनीं सांगितलें. परिषदेस जोडूनच स्त्री-विभागाचें अधिवेशन झालें. हें अधिवेशन श्री. सरलादेवी साराभाई यांचे अध्यक्षतेखालीं झालें. त्यामध्यें स्त्रियांनीं सहकारी चळवळींत प्रामुख्यानें भाग घ्यावा, ह्याविषयीं व ग्राहक सहकारी संस्था यांच्या अडचणींचा विचार झाला.

परिषदेनें तीन विषयनियामकसमित्या नेमल्या. (१) नियोजनामध्यें सहकारी चळवळीचें स्थान. (२) सहकारी पद्धतीवर खरेदीविक्री व विनियंत्रणामुळें होणारे परिणाम. (३) इन्कमटॅक्स आकारणी हें त्यांचे विषय होते. पहिल्या समितीच्या चर्चेचे वेळीं अध्यक्ष श्री. नंदा हे होते. अभ्यासपूर्वक व सखोल चर्चा झाली नाहीं याचें एक कारण असें असूं शकेल कीं विषयावरील टिपणें अगदीं आयत्या वेळीं दिलीं गेलीं व दुसरें असेंहि असेल कीं विषयाबद्दल आधीं कोणीच विचार केला नसावा. चर्चेचें मार्गदर्शन प्रो. द. गो. कर्वे करीत होते. माजी अर्थ-सहकार मंत्री व इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता हे अगदीं विनयानें पडणारें काम करीत होते, इतकेंच नव्हे तर विषयनियामक समितीची चर्चा चालूं असतां ते एकटे कोपऱ्यांत बसून ठरावांचा मसुदा तयार करीत होते. यावरून त्यांचे अंगांत सहकारी प्रवृत्ति अगदीं रोमरोमांतून भरली आहे हें दिसून येतें. परिषदेनें नियोजनासंबंधीं १५ कलमी ठराव पास केला असून त्यांत नियोजनामध्यें सहकारी चळवळीस जें स्थान दिलें आहे त्याबद्दल समाधान व्यक्त करून नियोजनामध्यें सुचविलेल्या संस्था परिपूर्ण होण्याचे दृष्टीनें सरकारास सूचना केल्या आहेत. त्यामध्यें मुख्यतः कायदे करतांना आर्थिक दृष्टीनें, तसेच सामाजिक दृष्टीनें नियोजनामधील कामांवर परिणाम होणार नाहीं अशी दृष्टि ठेवणें, नियोजनासंबंधीं खेडेगांवांत प्रसिद्धि देण्याचें काम प्रांतिक इन्स्टिटयूटनें करणें, सरकारी अधिकाऱ्यांना सहकारी तत्त्वाची जाणीव देण्याचा प्रयत्न करणें, सहकारी पद्धतीनें कर्ज देण्यासाठी पुरविलेली रक्कम अपुरी पडेल त्यासाठी जादा रक्कम देणें, कच्च्या मालाचे रूपांतरासाठीं ज्या ठिकाणीं सहकारी चळवळीचा विकास झाला आहे तेथें अवश्य असणारी यंत्रसामुग्री सरकारनें घेऊन ती सहकारी संस्थांस देणें, सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्रीची व्यवस्था व नियोजनासंबंधी वारंवार विचारविनिमय करण्याच्या दृष्टीनें सहकारी कौन्सिलनें पोटकमिट्या नेमून त्याचा विचार करावा, विनिमयामुळें उपस्थित झालेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं एक समिति नेमणें, वगैरे ठराव पास करण्यांत आले. सरकारी तगाईकर्जें सहकारी संस्थांमार्फत देण्याची शिफारस सरकारला करण्यांत आली. दूधउत्पादक व विम्याच्या सहकारी संस्था स्थापन कराव्यात असाहि ठराव पास झाला. कांहीं उत्पन्नाचेवर इन्कमटॅक्स माफी असावी असा ठराव पास झाला. परिषदेमध्यें चर्चेच्या दृष्टीनें भाषेची अडचण फार झाली-अशा परिषदा यशस्वी होण्याचे दृष्टीनें अनेक विषय न घेतां थोडेच विषय परंतु त्यासंबंधीं सर्व बाजूनें विचार व चर्चा झाल्यास ती अधिक उपयुक्त होईल असें वाटतें.

परिषदेमध्यें कांहीं खास नियुक्त केलेले प्रतिनिधी असतात. या परिषदेमध्यें असे कोण प्रतिनिधी होते हें समजणें कठीण व त्यामुळें त्यांनीं चर्चेत भाग घेतला किंवा नाहीं हेंहि कळणें कठीण.

परिषदेस जोडून एक लहानसें औद्योगिक प्रदर्शन भरलें होतें. यामध्यें मुख्यतः कापडी माल, हातमागावरील जिनसा, औषधें, यांचा समावेश होता व महिलांनीं चालविलेलें एक उपहारगृह होतें.

## कोळसा खाणींच्या मालकांची तक्रार

इंडिअन कोलिअरी ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. बी. एल. अगरवाल ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत भारतामधील कोळशाची नीट जपणूक होत नाहीं अशी तक्रार केली आहे. कोळशाची जपणूक करण्यासंबंधी जो कायदा करण्यांत आला आहे त्याची अंमलबजावणी नीट होत नाहीं असें सांगून ते पुढें म्हणाले, कीं हा कायदा अंमलांत आणावयाचा असेल तर सरकारनें सध्या परिस्थितीला तोंड दिलें पाहिजे. कोळशाची जपणूक करावयाची असेल तर कामगारांच्या संख्येंत कपात करणें आणि ज्या खाणींचें किंमतीवरील नियंत्रणामुळें नुकसान झालें असेल त्यांना नुकसानभरपाई देणें, ह्या दोन्ही गोष्टी अपरिहार्य आहेत. देशाचें औद्योगीकरण योजनाबद्ध रीतीनें करावयाचें असेल तर कोळशाच्या धंद्याचा विकास करणें आणि त्याच्या वहातुकीची नीट व्यवस्था लावणें अगत्याचें आहे. पण रेल्वे-बोर्डाला ह्या गोष्टींचें महत्त्व कधींच पटलेलें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. गेल्या वर्षांपासून रेल्वेबोर्डानें कोळशाच्या वहातुकीच्या दरांत वाढ केली आहे ती अनिष्ट अशी आहे. पूर्वीची प्रथा सोडून हें नवीन धोरण स्वीकारण्यांत आलेलें आहे. कोळशासारख्या जड वस्तूच्या वहातुकीचे दर ठरवितांना जें मूलभूत तत्त्व दृष्टीपुढें ठेवणें जरूर होतें तें डोळ्या-आड करण्यांत आलेलें आहे. इतर वस्तूंपेक्षा कोळशाच्या वहातुकीचे दर कमी ठेवण्यास पुष्कळ कारणें आहेत. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें आहे. रेल्वेबोर्डानें कोळशाच्या वहातुकीचे पूर्वीचे दर पुन्हा चालू केले नाहींत तर परिणाम फार वाईट होईल. बिहार सेस ॲक्टप्रमाणें कोळशावर जो स्थानिक कर घेण्यांत येतो तोहि अयोग्यच आहे. ह्या प्रकरणीं बिहार सरकारकडे कोळशाच्या खाणींच्या मालकांनीं आपली बाजू मांडली आहे. परंतु तरीहि बिहार सरकार आपलें धोरण बदलण्यास तयार नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे.

---

**काहीं बँकांचे ताळेबंद** ( ३१-१२-५२ )

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,६२,५०,००० | कॅश, इतर | |
| रिझर्व्ह, इतर फंड | ६,२५,००,००० | बँकांत | २५,७२,१७,५८० |
| ठेवी | २०६,०८,८१,५०२ | कॉलमनी | ३,८८,६१,४३२ |
| इतर बँकांकडून | | इन्व्हेस्ट- | |
| कर्ज | १५,६२,३६,७९६ | मेंट्स | ९७,१४,५६,६७७ |
| बिल्स पेएबल | २,९७,०३,१६९ | कर्जें | १११,८७,९८,६३६ |
| नफा | १,३३,३४,७९६ | इमारती, इ. | १,३१,८१,४४२ |
| | | इतर | १,३६,९४,०१५ |
| एकूण | २३९,३१,२७,८९१ | एकूण | २३९,३१,२७,८९१ |

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५०,००,००० | कॅश इतर बँकांत | १,८३,०४,०८० |
| रिझर्व्ह, इतर फंड | २४,००,००० | इन्व्हेस्टमेंट्स | ४,१७,६९,५९४ |
| ठेवी | ८,०४,४०,२१४ | कर्जें | २,७७,३७,३४३ |

---

**पाकिस्तानांत महाग पेट्रोल**—पाकिस्तानांत पेट्रोलची किंमत दर गॅलनमागें ३ रु. ३ आणे इतकी आहे असें समजतें. पाक रुपयाच्या किंमतीनें भारतांत, ब्रह्मदेशांत व सिलोनमध्यें २ रु. गॅलन ह्या दरानें पेट्रोल मिळतें. ब्रिटनमध्यें २ रु. २ आ., अमेरिकेंत १ रु. ५ आ., फ्रान्समध्यें २ रु. ९ आ. व सीरीयामध्यें २ रु. ८ आणे असे दर आहेत.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजांचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर



# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## —संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे, मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

स्थापना १९११

टेलिफोन नं. २५७६१, ३१,६९८ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ | तारेचा पत्ता : फार्मर्बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,२५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ४९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,८५,०२,२०० |

## १५ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३२१५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगावरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यात होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळांचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.